Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - V MAY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूंची कामगिरी व सामाजिक आर्थिक स्तर यांच्यात गुण संख्या संबंध

राहुल दिलीपकुमार मगदुम
डॉ.राजेश्वर भास्करराव देशमुख

***सारांश***

*सदरील संशोधन 'पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूंची कामगिरी व सामाजिक आर्थिक स्तर यांच्यात गुण संख्या संबंध' कोल्हापूर विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील तीन जिल्हयांचे २७९ महाविद्यालयामधून करण्यात आले. ॲथलेटिक्सच्या विविध प्रकारात प्रतिनिधित्व करणारे २०० पुरूष व २०० महिलांची निवड करण्यात आली. अकरा (११) सामाजिक व नऊ (९) आर्थिक स्तरांची निवड करण्यात आली. भटनागर व इतर (१९८७) यांची सामाजिक व आर्थिक संशोधन प्रक्रिया वापरण्यात आली. प्रश्नावलीच्या माध्यमातुन सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला. प्राप्त माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी गुण संख्या संबंधाची मदत घेतली. सर्वसाधारणत: संशोधनाचे निष्कर्षातुन असे दिसून येते की, पुरूष व महिला ॲथलेटिक्स*

१. पीएच.डी. विद्यार्थी व संचालक, शारीरिक शिक्षण, शिवराज कला, वाणिज्य व ड.स.कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.
२. संशोधक मार्गदर्शक व सहायक प्राध्यापक, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा नागनाथ, जि.हिंगोली.

*खेळाडूंच्या कामगिरीत सामाजिक सहभाग व कौटुंबिक क्रीडा संपादन सामाजिक स्तर तसेच आर्थिक स्तर म्हणून खेळाडूचे वार्षिक उत्पन्न, यांची उल्लेखनीय भूमिका आहे.*

**प्रमुख शब्द:** पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडू, सामाजिक, आर्थिक स्तर व गुण संख्या संबंध.

**प्रस्तावना:**

आयुष्यात प्रत्येकाला सुख स्वास्थ्य, सुरक्षितता व स्वत:चे संरक्षण करण्यासाठी, मानवाने पूर्वापार शरीराची जोपासना केली आहे. आपण ज्याला शरीर सुदृढ करण्याचे शिक्षण म्हणता त्यालाच शिक्षणक्षेत्रात श्शारीरिक शिक्षणश असे म्हणतात. स्पर्धा म्हणजे नुसते धावणे, पळणे, फेकणे, उड्या मारणे, जोरात चालणे हा हेतू नसून शरीर बलवान करून, व्यक्तीचा विकास करणे, समाजांचे स्वास्थ्य टिकविणे हा मूळ हेतू होता. म्हणूनच हया सामन्यांच्या व स्पर्धांच्या द्वारे बहुसंख्य राष्ट्रांत आपुलकी व स्नेहभाव निर्माण झालेला आढळतो सर्वांमध्ये खेळाडूवृत्ती निर्माण केली जाते. शारीरिक शिक्षण समाजाचा विकास करणारे एक साधन आहे. त्या दृष्टीने त्याचा विचार करून, आपल्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना त्याचे शिक्षण देउन देशाला प्रगतिपथावर नेणे हाच खरा शारीरिक शिक्षणाबाबतचा मूळ हेतू आहे. शारीरिक शिक्षण हा सामान्य शिक्षणाचा एक अविभाज्य घटक आहे.

ॲथलेटिक्स स्पर्धामध्ये धावणे, शर्यती, उड्या व फेकी या बाबींचा समावेश होतो. या स्पर्धांमध्ये साधारणपणे १०० ते १००० पर्यंत खेळाडू भाग घेत असतात. खेळाडूंची संख्या जितकी जास्त असेल तितका उत्साह खेळामध्ये येतो. क्रीडांगणावर खेळाडू असतात व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रेक्षक क्रीडांगणाबाहेर उपस्थित असतात. एकाच वेळी धावणे, शर्यत, उडीचा प्रकार व फेकीचा प्रकार क्रीडांगणावर चालू असतो. एका पाठोपाठ एक निरनिराळया

प्रकारचे खेळाडू आपापल्या स्पर्धामध्ये भाग घेत असतात. ॲथलेटिक्स क्रीडा मध्ये व्यक्तिगत किंवा सामुहिक खेळाडूच्या कामगिरीवर भर देण्यात आला तरी प्रत्येक खेळाडूच्या कामगिरीवर सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तराचा परिणाम प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या जाणवतो.

**संशोधनाचे उद्दिष्ट:**

पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूची कामगिरी व सामाजिक आर्थिक स्तर यांच्यात गुण संख्या संबंध संबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधन परिकल्पना:**

पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूची कामगिरी व सामाजिक आर्थिक स्तर यांच्यात गुण संख्या संबंधात तफावत असते.

**संदर्भ साहित्याचा आढावा:**

**करमरकर** (२०१२): मोहालीचा कपील देव व झारखंडचा महेद्रसिंग धोनी या गरिबीतुन वर आलेल्या धडपडणा—या युवकांच्या नेतृत्वाखालील भारत विश्वचषक जिंकू शकला आहे. तळागाळाच्या मुलांमध्ये वर येण्याची महत्वकांक्षा असते, जिद्द असते, महाराष्ट्राचा क्रीडा विकास वेगाने व्हायचा असेल तर तो खालून वर झाला पाहिजे.

**शेट्टी** (२०१२): कोणत्याही खेळाडूला आर्थिक विवंचना नसेल तर तो शांतचित्ताने आपल्या खेळाकडे लक्ष एकाग्र करू शकतो आणि म्हणूनच खेळाडूंना आर्थिक स्थौर्य मिळणे अत्यावश्यक आहे. राष्ट्रीय स्तरावर खेळणा—या खेळाडूंना मासिक विशिष्ट मानधन मिळण्याची व्यवस्था असायला हवी. याशिवाय दर्जेदार खेळ करणा—या खेळाडूकरिता नोक—यांची उपलब्धता होणेही तितकेच महत्वाचे आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत येणा—या सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्हयात करण्यात आली. तीन जिल्हयात एकूण २७९ महाविद्यालय कार्यरत आहे. हया महाविद्यालयातून २०० महिला व २०० पुरूष असे ४०० ॲथलेटिक्स खेळाडू ज्यांनी विविध ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारामध्ये भाग घेतला निवडण्यात आले. भटनागर *व इतर* (१९८७) यांनी सामाजिक व आर्थिक चलासाठी उपयोग केलेली संशोधन प्रक्रिया उपयोगात आणली सर्वेक्षणात्मक पध्दतीच्या आधारे प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिवर्चन करण्यासाठी गुण संख्या संबंध चा वापर करण्यात आला.

**निष्कर्ष:**

तक्ता क्र.१: पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूची कामगिरी व सामाजिक आर्थिक स्तर यांच्यात गुण संख्या संबंध.नं.४००

| अ. क्र. | स्तर | गुण संख्या संबंध | |
|---|---|---|---|
| | | **पुरूष ॲथलेटिक्स खेळाडू नं. २००** | **महिला ॲथलेटिक्स खेळाडू नं. २००** |
| **I.** | **सामाजिक स्तर** | | |
| १ | वय | ०.०३१ | ०.०५६ |
| २ | शिक्षण | ०.०३२ | ०.०६२ |
| ३ | पालकांचे शिक्षण | ०.०५८ | ०.९२३’’ |
| ४ | कुटूंब सदस्याचे शिक्षण | ०.०५२ | ०.३२९’’ |
| ५ | कौटुंबिक साक्षरता | ०.०३५ | ०.११९’ |
| ६ | कौटूंबिक क्रीडा संपादन | ०.४०५’’ | ०.२३२’ |
| ७ | कुटुंबाचा प्रकार | ०.०३९ | ०.०२८ |
| ८ | कुटूंबाचा आकार | ०.१०६ | ०.१०३ |
| ९ | घर व घराची परिस्थिती | ०.०७० | ०.०३९ |
| १० | निर्णय प्रक्रिया | ०.०३२ | ०.२९२ |
| ११ | सामाजिक सहभाग | ०.४३९’’ | ०.१२९’ |
| **II.** | **आर्थिक स्तर** | | |
| १ | खेळाडूंचे | ०.२३९’ | ०.१९८’ |

| | वार्षिक उत्पन्न | | |
|---|---|---|---|
| २ | कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न | ०.०३० | ०.०५९ |
| ३ | जमीन | ०.०२९ | ०.०५६ |
| ४ | पशुधन | ०.१२० | ०.१०० |
| ५ | साधनसासमुग्री | ०.०२५ | ०.०५० |
| ६ | कृषि अवजारे | ०.१०५ | ०.००३ |
| ७ | दुयम व्यवसाय | ०.१०१ | ०.०२३ |
| ८ | आर्थिक स्रोत | ०.०२९ | ०.१०९ |
| ९ | बचत | ०.१५९'' | ०.०३२ |

* ०.०५ पातळीवर सार्थक

** ०.०१ पातळीवर सार्थक

**पुरूष ॲथलेटिक्स खेळाडू:**

वरील तक्त्यानुसार असे दिसून येते की, पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीत सामाजिक स्तर मधून कौटुबिक क्रीडा संपादन (०.४०५) व सामाजिक सहभाग (०.४३९) ०.०१ पातळीवर सार्थक आहे. आर्थिक स्तराच्या बाबतीत, खेळाडूचे वार्षिक उत्पन्न (०.२३९) व बचत (०.१५९) अनुक्रमे ०.०५ व ०.०१ पातळीवर सार्थक आहे.

**महिला ॲथलेटिक्स खेळाडू:**

महिला ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरी बाबत वरील तक्त्यानुसार असे नमुद करण्यात येते की, सामाजिक स्तरामधून पालकांचे शिक्षण (०.९२३), कुटुंब सदस्याचे शिक्षण (०.३२९) ०.०१ पातळीवर व कौटुंबिक साक्षरता (०.११९) व सामाजिक सहभाग (०.१२९) हे ०.०५ पातळीवर सार्थक आहे.

महिला व पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरी मध्ये वय, शिक्षण, कुटुंबाचा प्रकार, कुटूंबाचा आकार, घर व घराची परिस्थिती व निर्णय प्रक्रिया सामाजिक स्तर म्हणून असार्थक आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न, जमीन, पशुधन साधनसामुग्री, कृषि अवजारे, दुयम व्यवसाय व आर्थिक स्रोत, आर्थिक स्तर म्हणून पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीसाठी असार्थक आहे.

**समारोप:**

पुरूष व महिला खेळाडूंच्या कामगिरीत सामाजिक स्तरामधून सामाजिक सहभाग व कौटुबिंक क्रीडा संपादन तर खेळाडूंचे वार्षिक उत्पन्न आर्थिक स्तर म्हणून महत्वपूर्ण स्तर आहे.

**संदर्भ सुची:**

१. करमकर, वि. वि. *भारतीय क्रीडा मंदिरातील राष्ट्रीय कबड्डी बिनचेह—याचीच असणार ?* एक्स्प्रेस टावर्स, नरिमान पॉईटं, मुंबई, दैनिक मराठी लोकसत्ता, १ जाने., २०१२ पृ. क्र. १२.

२. करमरकर, वि. वि. *सरकारमान्य क्रीडा धोरणाची ऐशीतैशी ! कबड्डी मॅटवर, प्रसाराचा विचार नाही !* एक्स्प्रेस टावर्स, नरिमान पॉईटं, मुंबई, दैनिक मराठी लोकसत्ता, ३ जाने., २०१२ पृ. क्र. १२.

३. शेटये सदानंद. *आता मक्तेदारी. उत्तरेकडे.* एक्स्प्रेस टावर्स, नरिमान पॉईटं, मुंबई, दैनिक मराठी लोकसत्ता, ४ जाने, २०१२ पृ. क्र. १२.